## लम्पी चर्मरोगाची लक्षणे (LSD) आणि प्रतिबंधक उपाय

सध्यस्थितीत महाराष्ट्रात काही भागामध्ये लम्पी चर्मरोग (LSD) चा संसर्ग आढळून आलेला आहे परंतु गोंदिया जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रमाणात जनावरांचे लसीकरण झाल्यामुळे मोठ्या जनावर मध्ये लम्पी चार्मरोगाचा कोणताही प्रसार नोंदविण्यात आलेला नाही. बदलत्या वातावरणामुळे जिल्ह्यामध्ये एक वर्षा पेक्षा लहान वासरामध्ये काही ठिकाणी अगदी किरकोळ स्वरुपाची लक्षणे दिसून आलेली आहे परंतु योग्य काळजी घेतल्यास ती ५-६ दिवसात  वासरांची प्रकृती सुधारत आहे.असे असले तरी पूर्वतयारी म्हणून पशुपालकानी काळजी घेणे गरजेचे आहे.

**लम्पी चर्मरोगाची जनावरामध्ये लक्षणे :**

लम्पी चर्मरोग गोवंशीय जनावरामध्ये (गाई,बैल) आढळणारा एक विशानुजन्य आजार आहे. या आजाराची मुख्य लक्षणे खालील प्रमाणे आहे

1. त्वचेवर गाठी : शरीरावर विशेषतः पाठ,पाय व मानेवर २-५ से.मी. आकाराच्या गोलसर गाठी दिसतात.
2. उच्च ताप: जनावरांना ४० ते ४१ डिग्री से. पर्यंत ताप येतो.
3. भूक मंदावणे : जनावर अन्न खाणे बंद करतो किंवा खूप कमी खातो .
4. दुध उत्पादनात घट : रोगग्रस्त गायीच दुध उत्पादन अचानक कमी होते.
5. डोळे व नाकातून स्त्राव : पाणीदार किंवा चिकट स्त्राव नाक आणि डोळ्यातून वाहतो.
6. श्वास घेण्यास त्रास : काही प्रकारामध्ये जनावरांना श्वास घेण्यास त्रास होतो.
7. अंग सुजणे व चालण्यात अडचण : गाठीमुळे पाय दुखतात आणि जनावर लंगडत चालत.
8. त्वचेवर जखमा : काही गाठी फुटून जखमा होतात आणि त्यातून पू बाहेर पडतो .

हा आजार डास, माश्या, गोचीडे याद्वारे पसरतो, तसेच संसर्गित जनावरांच्या संपर्कात आल्यामुळे हि होतो.  वेळेवर उपचार न झाल्यास जनावराचा मृत्यू होण्याची देखील शक्यता असते. म्हणून पशुपालकानी लम्पी चर्मरोगाचा प्रसार रोखण्यासाठी खालील प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाय करणे आवश्यक आहे.

❖ **लसीकरण :**

लम्पी चर्मरोगासाठी खास LSDV लस (Goatpox Vaccine) वापरण्यात येते. सर्व गोवंषीय जनावरांचे लसीकरण त्वरित करणे आवश्यक आहे.

❖ **गोठ्याचे व्यवस्थापन**

✓ गोट्यात पाणी येवू नये.गोठा कोरडा असावा.

✓ Potassium per magnet च्या द्रावनानी गोठा धुवून घ्यावा.

✓ गोट्यातील हवा खेळती व सूर्यप्रकाश असावा.

✓ गोठ्यातील सगळे खड्डे बुजवावे.

✓ मल व मुत्राची विल्हेवाट करावी.

✓ गोठा ८ ते १५ दिवसांनी फिनाईल च्या द्रावणाने स्वच्छ निर्जंतुक करावा.

- ✓ पावसाळ्यातगोचीड,गोमाश्या,मच्छर,डास,चिलटे यांच्या चाव्यामुळे विविध प्रकारचे आजार निर्माण होतात.त्यांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्यानुसार गोठ्यात व जनावरावर औषधी फवारावी.
- ✓ जनावरांना जंतनाशक औषधे पाजावी .
- ✓ गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याची पावडर गव्हाच्या किंवा धानाच्या तुसात मिसळून त्याचा पातळ थर गोठ्यात अंथरावा.

**❖ चाराव्यवस्थापन**

- ✓ जनावरांना पावसाने भिजलेला ओला चारा खाण्यास देऊ नये.
- ✓ ओले गवत मऊ असल्याने जनावरे ते कमी वेळेत अधिक प्रमाणात खातात त्यामुळे पचनक्रिया बिघडून त्यांना जुलाब होतो.
- ✓ जनावरांना फुलीचे गवत खाऊ घातल्यास विषबाधेमुळेकॅल्शीयम चे प्रमाण कमी होवून जनावरे दगवतात.
- ✓ जनावरांचा चारा,खाद्याची साठवणूक कोरड्या जागेत करावी .
- ✓ गवताच्या मुळ्यामध्ये अनेक विषारी घटक असतात त्यामुळे गवताची मुळे जनावरांच्या आहारात जाऊ नयेत याची काळजी घ्यावी.
- ✓ जनावरांना नदी नाल्याच्या काठी चारावयाला सोडू नये.

**❖ आरोग्य व्यवस्थापन**

- ✓ पावसाळी वातावरणात निरनिराळ्या जीवाणू आणि विषाणूंची झपाट्याने वाढ होवून जनावरे जीवाणूजन्य आणि विषाणूजन्य रोगास बळी पडतात त्यामुळे पशुवैद्यकाच्या मदतीने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे.
- ✓ संक्रमित जनावरे तत्काळ इतरांपासून वेगळी ठेवावी. विलगीकरण कालावधी किमान २८ दिवस पाळावा.
- ✓ जनावरांना कृमिनाशक औषधांची मात्रा द्यावी .
- ✓ लहान वासरांना पावसाळ्यात न्युमोनिया होण्याची शक्यता जास्त असून,वासरे दगवण्याची शक्यता जास्त असते.
- ✓ वासरांना कोरड्या जागेत बांधावे,स्वच्छ पाणी प्यायला द्यावे.
- ✓ दुध काढण्याअगोदर व काढल्यानंतर जनावरांची स्तने व कासpotassium per magnet च्या द्रावणाने निर्जंतुक करावे, जेणेकरून दुग्ध जनावरांना कासदाह होणार नाही.
- ✓ पावसाळ्यात जनावरे माजावर येण्याचेसुद्धा प्रमाण जास्त असते त्यामुळे माजाच्या योग्य वेळी जनावरे कृत्रिम रेतनाद्वारे फळवून घ्यावीत.

**डॉ. कल्याणीवा.सरप**
विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन)
कृषी विज्ञान केंद्र,हिवरा,गोंदिया